क्र. पोमस/23/54/डिजीटल पुरावे/1253/2015

मुंबई, दि. 12/10/2015

**विषय :- गंभीर गुन्ह्यामध्ये डिजीटल पूरावे घेण्याबाबत.**

*******

**परिपत्रक**

एखाद्या गुन्ह्याची फिर्याद दाखल झाल्यानंतर फौजदारी प्रक्रिया संहिता (CrPC) प्रमाणे पोलीस तपास करीत असताना फिर्याद घेणे, घटनास्थळाचा पंचनामा करणे, साक्षीदारांचा जबाब नोंदविणे इत्यादी पुरावे गोळा करण्याचे काम करण्यात येते. सायबर क्राईमचे वाढते प्रमाण तसेच पारंपारिक गुन्ह्यामध्ये पुरावे गोळा करण्याच्या पध्दतीत शास्त्रशुध्द संगणकीय बाबींचा उपयोग केल्यास न्यायालयामध्ये गुन्ह्यांचे अपराध सिध्दीचे प्रमाण वाढ होण्यास मदत होऊ शकते. यासंबंधाने खालील सूचना देण्यात येत आहेत :-

**1) <u>फिर्याद</u>** - बयाच वेळा पोलीसांसमोर फिर्याद नोंदविली जाते व नंतर फिर्यादीच कोर्टासमोर फितूर होऊन फिर्याद दिल्याचे नाकारतो. अशा गुन्ह्यामध्ये अपराध सिध्द करताना अडथळे निर्माण होतात. त्यामुळे फिर्यादीची फिर्याद नोंदवत असताना त्याचे व्हिडीओ शुटींग करावे, जेणे करुन फिर्यादी फितूर झाल्यास फिर्याद सिध्द करण्याकरीता त्या व्हिडीओ शुटींगचा उपयोग न्यायालयात सुनावणी दरम्यान होऊ शकतो.

**2) <u>घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा</u>** - गुन्हा घडल्यानंतर बयाच कालावधीने त्या गुन्ह्याची सुनावणी न्यायालयात सुरु होते. त्यामुळे पंचांनी पाहिलेल्या गोष्टींचे त्यांना विस्मरण होण्याची शक्यता असते किंवा पंच देखील फित्रूर होतात. त्यामुळे पंचनामा करतेवेळी पंचांसमवेत घटनास्थळाचे व्हिडीओ शुटींग करण्यात यावे. तसेच घटनास्थळावरुन काही वस्तू पूराव्याकामी जप्त केल्या असल्यास त्याचे देखील व्हिडीओ शुटींग करण्यात यावे.

**3) <u>साक्षीदारांचे जाब-जबाब</u>** - गंभीर व महत्वाच्या गुन्ह्यांमध्ये साक्षीदारांचे जाब-जबाब देखील व्हिडीओ शुटींगमध्ये नोंदविता येतील.

2. वरील पूरावे डिजीटल पध्दतीने घेत असताना मा.न्यायालयात ते सिध्द करण्याच्या दृष्टीने काही तांत्रिक बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

**अ)** सदर बाबी भारतीय पूरावा कायदा 65 ब प्रमाणे ग्राह्य धरण्यात येते.

**ब) हॅश व्हॅल्यू** - कोणतीही इलेक्ट्रॉनिक / डिजीटल नोंद जसे ऑडिओ रेकॉर्डींग / व्हिडीओ रेकॉर्डींग / संगणकावर तयार केलेले पत्र / मेल / डिझाईन / डिजीटल पध्दतीने काढलेले फोटो किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक / डिजीटल पध्दतीने तयार केलेल्या कोणत्याही गोष्टीकरीता त्या गोष्टीपुरती एक

तपासाच्या फाईलमध्ये / दोषारोप दाखल करते वेळी इलेक्ट्रॉनिक / डिजीटल पूराव्यासह त्यामध्ये लावण्यात यावे. (त्याचा नमूना सोबत जोडला आहे)

9) तसेच सदरील हॅश व्हॅल्यु कोणत्या पध्दतीने काढली. जसे MD5, SHA आणि सॉफ्टवेअरचे नाव व व्हर्जनचा स्पष्ट उल्लेख असावा.

10) या संबंधाने असेही सुचविण्यात येते की, सदरील सॉफ्टवेअर अद्ययावत (Latest) व मान्यता (Authentic) प्राप्त असलेले असावे. हे सॉफ्टवेअर कोणत्याही परिस्थितीत पायरेटेट कॉपी असू नये याची दक्षता घ्यावी.

**(दोन) काय करु नये -**

1) डिजीटल डॉक्युमेन्टची मूळ प्रत सेव्ह केल्यानंतर पून्हा मूळ प्रत तपासाच्या दृष्टीने वापरु नये.

2) हॅश व्हॅल्यू काढलेल्या पुराव्यामध्ये जर कोणी त्या डिजीटल डॉक्युमेन्ट मध्ये बदल (Tamper) केल्यास ही हॅश व्हॅल्यू बदलते व असा बदल (Tamper) केलेला पूरावा म्हणून न्यायालयात ग्राह्य नाही. त्यामुळे हॅश व्हॅल्यू काढलेल्या पुराव्यात कोणी बदल करणार नाही याची खबरदारी घ्यावी.

3) डिजीटल पुरावे गोळा करण्यासाठी वापरण्यात आलेले मेमरी कार्ड जुने नसावे.

3. सर्व घटक प्रमुखांनी या परिपत्रका संदर्भात योग्यती कार्यवाही सुरु करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील 15 दिवसात न चुकता या कार्यालयास सादर करावा. तसेच मासिक गुन्हे सभेच्या वेळी सर्व अधिकारी यांना या परिपत्रका संदर्भात त्यांनी काय कार्यवाही केली याबाबत विचारणा करुन त्याचा पाठपूरावा करावा.

**(प्रभात कुमार)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (का व सु)
पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,

पोलीस आयुक्त (शहरे / लोहमार्ग सह)
पोलीस अधीक्षक (जिल्हे / लोहमार्गसह)

प्रत-

महासंचालक, अेसीबी, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (सादर अग्रेषित)
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, ना.ह.स. / लोहमार्ग / वाहतूक / द.वि.प./ महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक 22,24,36

## Certificate U / Sec. 65(B) of Indian Evidence Act

(Certificate issued for the conversation recorded in CD / Micro SD Card / Video Recording at the time of Filing FIR / Preparing Panchnama / Recording Statements)

I undersigned, P.C. No. 0000/ XYZ attached to ............................................... ,

State to the best of my knowledge and belief that –

1. The CD/ Micro SD Card titled "recorded conversation at the time of Filing FIR / Preparing Panchnama / Recording Statements" created on 00/00/2015 and 00/00/2015 contains conversation/ Video shooting recorded in the Digital Recorder / Digital Video Recorder operated by me.

2. The said conversation is recorded in the Digital Recorder / Digital Video Recorder / Micro SD Card during the period over which the Digital Recorder is used regularly to record and listen conversation for the purposes of activities regularly carried on over that period by trained persons.

3. During the said period, information of the kind contained in the electronic record was regularly recorded in to the Digital Recorder / Digital Video Recorder / Micro SD Card in the ordinary course of the said activities.

4. Throughout the material part of the said period, the Digital Recorder / Digital Video Recorder and computer / laptop was operating properly.

5. The CD / Micro SD Card referred to above is appropriately copied from the relevant Digital Recorder / Digital Video Recorder with the help of computer / laptop.

Signed on this ......day of............2015

Sd/-
(X Y Z)
Police Constable / Police Naik No.-0000

---